॥ या विद्या या विमुक्तये ॥

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

# SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'B++' grad

Fax : (02462) 215572 **NATIONAL SERVICE SCHEME DEPARTMENT** website: srtmun.ac.in

Phone: (02462) 215246 E-mail: nss@srtmun.ac.in

जा.क्र. रासेयो/२०२३-२४/३८९ दिनांक २५/०९/२०२३

## परिपत्रक

प्रति,
मा. प्राचार्य/रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी,
रा.से.यो. राबविणारी सर्व संलग्नीत महाविद्यालये,
प्रस्तुत विद्यापीठ.

विषय: "स्वच्छताही सेवा" अंतर्गत कार्यक्रम आयोजित करणे बाबत

संदर्भ: १) मा. अ.म. बाविस्कर, उपसचिव, महाराष्ट्र शासन यांचे E-671559/HTED-24011(11)/27/2023- MHT-((UE-3) दिनांक १३ सप्टेंबर २०२३.

२) मा. अजय शिंदे, क्षेत्रिय निदेशक, क्षेत्रिय निदेशालय रा.से.यो पुणे यांचा दिनाक २६/०९/२०२३ रोजीचा ई–मेल.

महोदय,

उपरोक्त विषयी संदर्भ क्र. १ अन्वये मा. अ.म. बाविस्कर, उपसचिव, महाराष्ट्र शासन, मुंबई यांनी उपरोक्त विषयाबाबत मा. प्रधानमंत्री यांनी केलेल्या आवाहनानुसार दिनांक ०१ ऑक्टोबर २०२३ रोजी सकाळी १०:०० वाजता पासून १ तास "स्वच्छताही सेवा" अंतर्गत राज्यभरात स्वच्छतेसाठी श्रमदान कार्यक्रम आयोजित करण्याबाबत कळविले आहे. तसेच संदर्भ क्र. २ अन्वये मा. अजय शिंदे, क्षेत्रिय निदेशक, क्षेत्रिय निदेशालय रा.से.यो, पुणे यांनी दिनांक ०१ व ०२ ऑक्टोबर २०२३ या कालवधीत खालील प्रमाणे कार्यक्रम राबविण्याबाबत कळविले आहे.

१) स्वच्छता रन/ स्वच्छता जनजागरण रॅली

२) महाविद्यालय व महाविद्यालय परिसराची स्वच्छता.

३) सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता.

४) दत्तक गावामध्ये स्वच्छता मोहिम राबविणे

५) स्वच्छता जनजागृतीसाठी इतर उपक्रम

तरी त्या अनुषंगाने रा.से.यो. संलग्नीत सर्व महाविद्यालयांना सुचित करण्यात येते की, संदर्भ क्र. १ च्या अनुषंगाने आपल्या महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेत्तर अधिकारी/कर्मचारी व विद्यार्थ्यांमार्फत दिनांक ०१ ऑक्टोबर २०२३ रोजी सकाळी १०:०० वाजता पासून १ तास "स्वच्छताही सेवा" अंतर्गत स्वच्छता करण्यासाठी विविध कार्यक्रम आयोजित करण्यात यावे. तसेच संदर्भ क्र. २ च्या अनुषंगाने उपरोक्त कार्यक्रम राबवून सदर उपक्रमाचे फोटो, व्हिडीओ त्याच दिवशी

**https://swachhbharatmission.gov.in/shs2023/** या लिंकवर सायंकाळी ४:०० पर्यंत अपलोड करण्यात यावेत, ही विनंती.

User ID details
**User ID:shs_doya**
**Password:Shs@2023#**

स्वच्छताही सेवा या उपक्रमाचे यशस्वीपणे आयोजन करून त्याचा अहवाल व फोटो, **व्हिडीओ** रा.से.यो विभागाच्या **nss@srtmun.ac.in** या ई–मेल वर पाठविण्यात यावे तसेच व्हॉट्स अप, ट्विटर, युट्युब, फेसबूक, इंस्टाग्राम इत्यादी सोशल मिडीया वर अपलोड करावे.

डॉ. मल्लिकार्जुन करजगी
**संचालक**
राष्ट्रीय सेवा योजना विभाग

प्रत माहितीस्तव:
१) मा. कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
२) मा. प्र.कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
३) मा. कुलसचिवांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
४) मा.जनसंपर्क अधिकारी, जनसंपर्क कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.

प्रत माहिती तथा कार्यवाहिस्तव:
१) सिस्टीम एक्सपर्ट, संगणक कक्ष, प्रस्तुत विद्यापीठ, यांना प्रत देवून कळविण्यात येते की, सदरील परिपत्रक विद्यापीठाच्या व रा.से.यो विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे, ही विनंती